# QUICK NEWS

## मणिपूरमध्ये भूकंप

**इंफाळ(ए).** मणिपूरमध्ये मंगळवारी सकाळी भूकंपाचे झटके जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाचा तीव्रता 3.8 एवढी मोजण्या आली. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीने याविषयी माहिती दिली. सोमवारीदेखील मणिपूरच्या उखरुल येथे भूकंपाचे तीव्र धक्के बसले होते. या भूकंपाची तीव्रता 4.4 एवढी होती. यापूर्वी गुरुवारीदेखील भूकंप जाणवला होता.

## पीएम केअर फंडात सर्वांत मोठी फसवणूक

**श्रीनगर.** पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी (पीडीपी) अध्यक्षा मेहबूबा मुफ्ती यांनी असा आरोप केला की पीएम-केअर्स हा भ्रष्टाचाराचा अत्याधुनिक मार्ग आहे कारण पंतप्रधान निधी प्राप्त झालेल्या पैशाचे खाते सार्वजनिक करण्यास इच्छुक नाहीत. 2016 मध्ये चलनी नोटांच्या नोटाबंदीच्या प्रश्नावर त्या म्हणाल्या की, भ्रष्टाचार संपवणे, काळा पैसा परत करणे आणि हिंसाचार संपवणे हा या सरावाचा उद्देश असल्याचे सांगितले. तथापि, आज भ्रष्टाचार शिगेला पोहोचला आहे. तो आता पीएम केअर फंडासारख्या अत्याधुनिक पद्धतीने केला जातो. पंतप्रधान असताना तुमच्याकडे असलेल्या पैशांचा हिशेब द्यायचा नाही हा भ्रष्टाचार नाही तर काय आहे? असा सवालही त्यांनी केला.

मेहबूबा मुफ्तींचा आरोप



## राफेल : मोदी सरकारचा सर्वात मोठा संरक्षण घोटाळा: काँग्रेस

# 526 कोटींची डील, खरेदी 1600 कोटीत



**दिल्ली, वृत्तसंस्था.** काँग्रेसने राफेल डीलमध्ये लाचखोरीच्या आरोपावरून केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. राफेल सौदा हा देशातील सर्वात मोठा संरक्षण घोटाळा असल्याचा आरोप काँग्रेसने केला. राफेलमध्ये लाचखोरीला दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला, असेही काँग्रेसने म्हटले आहे. पक्षाचे प्रवक्ते पवन खेरा यांनी पत्रकार परिषद घेऊन मोदी सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. राफेल सौद्यातील भ्रष्टाचाराला दडपण्यासाठी मोदी सरकारचे ऑपरेशन कव्हरअप सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. युपीए सरकारने 526.10 कोटी रुपयांमध्ये विमान खरेदी करण्यावर चर्चा केली असताना मोदी सरकारने तीच विमाने टेंडरविनाच 1670 कोटींमध्ये खरेदी केली, असा आरोप त्यांनी केला.

### 41205 कोटींच्या फरकाने सौदा



"काँग्रेस-यूपीए सरकारने आंतरराष्ट्रीय निविदांनंतर तंत्रज्ञान हस्तांतरणासह 526.10 कोटी रुपयांना राफेल लढाऊ विमान खरेदी करण्यासाठी चर्चा केली होती. मोदी सरकारने तेच राफेल लढाऊ विमान (कोणत्याही निविदाशिवाय) 1670 कोटींना विकत घेतले आणि भारताला तंत्रज्ञान हस्तांतरित न करता 36 जेट विमानांच्या किंमतीत सुमारे 41,205 कोटींचा फरकाने अधिकचा सौदा केला.

– पवन खेरा, प्रवक्ते, काँग्रेस

### थांबू नका, थकू नका, घाबरू नका



"जर पावलोपावली सत्याची साथ असेल तर काळजी कशाची? माझ्या काँग्रेसच्या साथींनो, भ्रष्ट केंद्र सरकारच्या विरोधात अशाच प्रकारे लढत रहा. थांबू नका, थकू नका आणि घाबरु नका!

– राहुल गांधी, काँग्रेस नेते

### चोरच चौकीदाराला जाब विचारतोय



"राफेलचा विषयही मोठ्या घोट्याळ्याचा विषय असून हे संपूर्ण प्रकरण सन 2007 ते 2012 दरम्यान घडले आहे. या काळात लाचखोरीचा प्रयत्न झाला आहे. यामध्ये मध्यस्थाचे नावही समोर आले आहे. सुषेण गुप्ता असे याचे नाव आहे. काँग्रेसच्या काळात झालेला हा व्यवहार समोर आला आहे. यातील मजकूर पाहिल्यास आपल्याला आश्चर्याचा धक्काच बसेल. हे कमिशन काही 2 किंवा 4 टक्क्यांचे नव्हते. राहुल गांधी, सोनिया गांधी तुमचं अभिनंदन, कारण 40 टक्क्यांच्या दराने आपण कमिशन घेऊन जगातील कमिशनचं रेकॉर्ड तोडला. इथे उलट चोरच चौकीदाराला जाब विचारत आहे.

– संबित पात्रा, प्रवक्ते, भाजपा

### ३६ महिन्यांत कारवाई का नाही?

4 ऑक्टोबर 2018 रोजी भाजपाचे माजी मंत्री आणि ज्येष्ठ वकील यांनी सीबीआयच्या तत्कालीन संचालकांना कागदपत्रे सोपवली होती. 11 ऑक्टोबर 2018 ला मॉरिशस सरकारनेही सीबीआयकडे कागदपत्रे सोपवली. त्यानंतर कोणतीही चौकशी सुरू झाली नाही आणि मध्यरात्री आलोक वर्मांना काढून आपल्या पसंतीचे नागेश्वर राव यांना सीबीआय संचालक बनवले होते. 36 महिन्यांत कारवाई का झाली नाही? असा सवाल करतानाच हे 60-65 कोटींच्या घोटाळ्याचे प्रकरण नाही, हा सर्वात मोठा संरक्षण घोटाळा आहे, असा आरोप खेरा यांनी केला.

# माझ्या एका खिशात ब्राह्मण; दुसऱ्यात बनिया

### भाजपा नेत्याच्या वक्तव्यावरून वाद

**भोपाळ, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** मध्यप्रदेश भाजपाचे राज्य प्रभारी पी. मुरलीधर राव यांनी आता राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. पी मुरलीधर राव यांच्या ब्राह्मण आणि बनिया (वाणी) समाजाबद्दल केलेल्या वक्तव्यावरून नवा वाद निर्माण झाला आहे. त्यानंतर त्यांनी या प्रकरणी स्पष्टीकरण दिले आहे. आगामी काळात भाजपा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आणि ओबीसी प्रवर्गावर लक्ष केंद्रित करत आहे तर दुसरीकडे मुरलीधर यांच्या या वक्तव्यानंतर राज्याचे माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांनी भाजपावर टीकास्त्र सोडले आहे.

### काय केले वक्तव्य?



भाजपा हा कधी ब्राह्मण-वाण्यांचा पक्ष होता, तर कधी एससी, एसटी, ओबीसींचा पक्ष असे का ?असे मुरलीधर राव यांना विचारण्यात आले. आपण विकासाच्या गप्पा मारतो, मात्र जातीच्या नावावर मते का मागितली जातात? असाही प्रश्न यावेळी विचारण्यात आला होता. त्यावर मुरलीधर राव यांनी उत्तर दिले. माझ्या एका खिशात ब्राह्मण, दुसऱ्या खिशात वाणी आहेत. आता प्रश्न विचारला आहे, तर उत्तर ऐका. माझ्या व्होट बँकेत माझ्या कार्यकर्त्यांमध्ये, माझ्या नेत्यांमध्ये ब्राह्मण आहेत म्हणून त्याला ब्राह्मणांचा पक्ष म्हटले गेले. वाणी आहेत म्हणून वाण्यांचा पक्ष म्हटले. पक्ष सर्वांसाठी सुरू केला होता, पण माझ्याकडे त्यावेळी काही विशिष्ट वर्गातील लोक जास्त होते, त्यामुळे तुम्ही म्हणता की हा पक्ष त्यांचा आहे. आपण सर्वांचा पक्ष बनवण्याचे काम करत आहोत, असे मुरलीधर राव म्हणाले.

### मुख्यमंत्री कमलनाथ यांचे प्रत्युत्तर



त्यांच्या या वक्तव्यावर माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांनी प्रत्युत्तर दिले आहे. त्यांनी मुरलीधर राव यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दात निषेध करत माफी मागण्याची मागणी केली. प्रभारींनी यापूर्वी भाजपाच्या चार-पाच वेळा खासदार-आमदारांना अपात्र म्हटले आहे. त्यांच्या माजी नेत्याने क्षत्रिय समाजाचा अपमान केला आहे. त्यांनी या दोन्ही समाजांची माफी मागावी, असे कमलनाथ यांनी म्हटले आहे.

### राव यांनी दिले स्पष्टीकरण

दरम्यान, या विधानावरून वाद निर्माण झाल्यानंतर पी मुरलीधर राव यांनी स्पष्टीकरण दिले. आमचा पक्ष हा सर्व वर्गातील ब्राह्मण आणि वाण्यांचा पक्ष आहे. आमच्यासाठी वाणी आणि ब्राह्मण यांच्यात फरक नाही. भाजपा सर्वांना बरोबर घेऊन चालली आहे, असे मुरलीधर राव म्हणाले.

### लखीमपूर हिंसाचार

## मंत्रिपुत्राच्या बंदुकीतूनच झाला गोळीबार

**लखनौ, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** लखीमपूर खिरी हिंसाचार प्रकरणी मोठा खुलासा झाला आहे. लखीमपूर हिंसाचारावेळी गोळीबार झाला होता. तीन हत्यारांना गोळीबार झाल्याचे पुरावे मिळाले आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि केंद्रीय मंत्र्यांचा मुलगा आशिष मिश्रा याची बंदुकही तपासणी पाठवण्यात आली होती. आशिष मिश्राच्या बंदुकीतून गोळीबार झाल्याचे फॉरेन्सिक तपासात समोर आले आहे, असा दावा मीडिया रिपोर्ट्समधून करण्यात आला आहे. लखीमपूर खिरी प्रकरणातील दुसरा आरोपी अंकीत दास याच्या पिस्तुलाचीह तपासणी केली गेली. तसेच अंकीतचा याचा गनर लतीफ याच्या रिपीटर गनचीही तपासणी झाली. घटनास्थळावरून पळ काढताना परवाना असलेल्या शस्त्रांद्वारे गोळीबार झाला होता. पण पोस्टमार्ट रिपोर्टमध्ये कुणालाही गोळी लागल्याचे समोर आलेले नाही. पण तपासात पोलिसांना गाड्यांवर गोळ्यांचे निशाण आढळून आले.

### सामान्य लोक दहशतवाद्यांचे 'टार्गेट'

## नागरिकाची दहशतवाद्यांकडून हत्या

**श्रीनगर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** येथे दहशतवादी सामान्य नागरिकांना लक्ष्य करत आहे. श्रीनगरमधील बोहरी कदल भागात दहशतवाद्यांनी एका नागरिकाची गोळ्या झाडून हत्या केली. काश्मीरमध्ये 24 तासांत झालेला हा दुसरा दहशतवादी हल्ला होता. जम्मू-काश्मीर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बांदीपोरा येथील मोहम्मद इब्राहिम खान यांची दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केली. मोहम्मद हे सेल्समन म्हणून काम करायचे. रुग्णालयात उपचारादरम्यान इब्राहिम यांचा मृत्यू झाला. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, श्रीनगरमधील बांदीपोरा येथील निवासी गुलाम मोहम्मद खान यांचा मुलगा मोहम्मद इब्राहिम खान यांना जवळून गोळी मारण्यात आली. ज्यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र त्यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. खान यांच्या मृत्यूनंतर खोऱ्यातील एकूण नागरिकांचा आकडा 15 वर पोहोचला आहे.

### ओमर अब्दुल्लांचे ट्विट



नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी नागरिकांच्या हत्येचा निषेध केला आहे. ओमर यांनी ट्विट केले की, इब्राहिमची क्रूर हत्या निंदनीय आहे आणि मी त्याचा तीव्र निषेध करतो. दुर्दैवाने, इब्राहिमची हत्या ही खोऱ्यातील, विशेषतः श्रीनगरमधील लक्षित हत्यांच्या मालिकेतील नवीनतम घटना आहे. अल्लाह त्यांना स्वर्गात स्थान देवो.

## पाकिस्तानविरोधात आंदोलन...



**जम्मू.** काश्मीर खोऱ्यात सामान्य नागरिक दहशतवाद्यांचे लक्ष्य बनत आहे. नुकत्याच अनेक नागरिकांच्या हत्या झाल्याचा निषेध करण्यासाठी शिवसेना व डोगरा फ्रंटच्या कार्यकर्त्यांनी पाकिस्तानविरोधात आंदोलन केले. यावेळी त्यांनी पाकचा ध्वज जाळला.

### भारताला जलव्यूहरचना बदलावी लागणार

## चीनकडून पाकला अत्याधुनिक युद्धनौका

**दिल्ली, वृत्तसंस्था.** पाकिस्तानचे आणि चीन हे दोन्ही देश भारतावर कुरघोडी करण्याकरिता सातत्याने प्रयत्न करत आले आहेत. एकमेकांना मदत करत परस्पर सहकार्यही वाढवत आले आहे. याचाच एक भाग म्हणून गेली अनेक वर्ष चीन पाकिस्तानला लष्करी मदत करत आला आहे. याआधी जेएफ-17 हे चौथ्या श्रेणीतील लढाऊ विमान विकसित करायला चीनने पाकिस्तानला मदत केली होती. आता तर जेएफ-17 हे पाकिस्तान वायू दलाचा महत्त्वाचे लढाऊ विमान आहे. असे असताना चीन युद्धनौकांच्या बाबतीतही पाकिस्तानला मदत करत आहे. चीन अत्याधुनिक स्टेल्थ फ्रिगेट टाईप 054 ही पाकिस्तानला देणार आहे. एक युद्धनौका तर पुढील काही दिवसांत पाकिस्तानला मिळणार आहे तर आणखी 3 युद्धनौका चीन पुढील 3 वर्षात पाकिस्तानकडे सुपुर्त करणार आहे.

### ४००० टन वजनाची दर्जेदार युद्धनौका



टाईप 054 ही सुमारे 4 हजार टन वजनाची फ्रिगेट- युद्धनौका जगातील अत्याधुनिक युद्धनौकांपैकी एक म्हणून ओळखली जाते. रडारवर पटकन शोधता येणार नाही अशी या युद्धनौकेची रचना आहे. जमिनीवर, हवेत विविध प्रकारची क्षेपणास्त्रे डागण्याची या युद्धनौकेची क्षमता असून पाणबुडीविरोधी कारवाईतही ही युद्धनौका दर्जेदार समजली जाते. अशा 25 पेक्षा जास्त युद्धनौका या चीनच्या नौदलात याआधीच कार्यरत आहेत. आता पुढील काही वर्षात चिनी बनावटीच्या अशा चार युद्धनौका या पाकिस्तानकडे असतील. यामुळे निश्चितच भारताची डोकेदुखी वाढणार आहे. युद्धप्रसंग उद्भवल्यास टाईप 054 युद्धनौका या भारतीय नौदलापुढे मोठे आव्हान निर्माण करू शकतात अशी या युद्धनौकेची क्षमता आणि ताकद आहे.

## चीनची भारतविरोधी 'ऑनलाइन' मोहीम

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** सीमेवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. मात्र, चीनला सीमेवर तणावाची स्थिती कायम ठेवण्यास रस आहे. त्यामुळे चीनकडून वारंवार सीमेवरील वातावरण बिघडवणाऱ्या कारवाया करण्यात येत आहेत. आता चीनकडून भारताविरोधात ऑनलाइन मोहीम सुरू करण्यात आली असून, त्याअंतर्गत जुने व्हीडिओ शेअर करून वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. एवढेच नाही तर या मोहिमेद्वारे अरुणाचल प्रदेशात लष्करी कारवाईची धमकीही देण्यात आली आहे. भारतीय सीमेवर पीपल्स लिबरेशन आर्मीच्या जवानांचे जुने व्हीडिओ आणि फोटो सोशल मीडियावर अनेक व्हेरिफाईड आणि अनव्हेरिफाईड अकाऊंटवरून शेअर केले जात आहेत. चीनमध्ये ट्विटरवर बंदी घालण्यात आली असली तरी, भारतीय सीमेवर तैनात असलेल्या पीएलए सैनिकांचे फोटो आणि माहितीने हा प्लॅटफॉर्म पूर्णपणे भरून टाकण्याचा कट रचला जात आहे.

## अन्सल बंधूंना ७ वर्षांचा तुरुंगवास

**दिल्ली(ए).** पटियाला हाऊस न्यायालयाने दिल्लीतील उपहार सिनेमा आगप्रकरणी निकाल दिला. पुराव्यांशी छेडछाड केल्याप्रकरणी न्यायालयाने मुख्य आरोपी सुनील अन्सल आणि गोपाल अन्सल यांच्यासह अन्य दोन दोषींना 7-7 वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच न्यायालयाने दोषींना 2.25 कोटी रुपये इतका दंडही ठोठावला आहे. अन्सल बंधूंवर पुराव्यांशी छेडछाड केल्याचा ठपका ठेवत न्यायालयाकडून कारावासाची शिक्षा सुनाविण्यात आली आहे. पटियाला हाऊस न्यायालयाने उपहार सिनेमा आग प्रकरणात 8 ऑक्टोबर रोजी पुराव्यांशी छेडछाड केल्याप्रकरणी सुशील आणि गोपाल अन्सल बंधूंसह पाच जणांना दोषी ठरवले होते. या प्रकरणात न्यायालयाने अन्सल बंधूंसह न्यायालयाचे माजी कर्मचारी दिनेशचंद शर्मा, पीपी बत्रा आणि अनूप सिंग यांनाही दोषी ठरवले होते.

### कुंभ मेळाव्यातील कोरोना चाचणी घोटाळा

## मुख्य आरोपींना अटक

**हरिद्वार, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** कुंभ मेळाव्यादरम्यान झालेल्या बनावट कोरोना चाचणी घोटाळ्या प्रकरणाच्या तपासात एसआयटीला मोठे यश मिळाले आहे. याप्रकरणी विशेष तपास पथकाने दोन आरोपींना अटक केली आहे. या दोन्ही आरोपींना उत्तर प्रदेशातील नोएडा शहरातून अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली. एसआयटीच्या या कारवाईबाबत माहिती देताना एसएसपी योगेंद्र सिंह रावत म्हणाले की, शरद पंत आणि मल्लिका पंत अशी अटक आरोपींची नावे आहेत. पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, एसआयटी टीम शरत आणि मल्लिका या दोघांनाही हरिद्वारला घेऊन येत असून येथे त्यांची सखोल चौकशी केली जाईल. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांना पकडण्यासाठी एसआयटी दिल्लीतच होती. कोरोनाच्या काळात हरिद्वार कुंभ मेळाव्यात येणाऱ्या भाविकांसाठी कोरोना तपासणीचा अहवाल अनिवार्य करण्यात आला होता.




### घोटाळा उघडकीस

फरीदकोट येथील एका रहिवाशाने आपली कोरोना चाचणी केली नसताना त्याला आपला कोरोना अहवाल घेण्यास या, असा मेसेज आला. ज्यानंतर या व्यक्तीने याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना तक्रार केली. या तक्रारीच्या आधारे तपास सुरू करण्यात आला, ज्यामध्ये सुमारे एक लाखाहून अधिक बनावट रॅपिड अँटीजेन चाचण्या आढळल्या. हरिद्वारमध्ये कोरोना चाचणीत घोटाळा समोर आल्यानंतर मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या आदेशानुसार मॅक्स कॉर्पोरेट, नलवा लॅब आणि डॉ. लाल चांदणी लॅब सेंट्रल दिल्ली यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर एसएसपींनी सखोल तपासासाठी एसआयटी टीम तयार केली होती.

## तामिळनाडूत ऑरेंज अलर्ट

**चेन्नई(ए).** तामिळनाडूची राजधानी चेन्नईसहित अनेक भागात दोन दिवसांपासून पावसाचा कहर सुरू आहे. आयएमडीने राज्यातील 14 जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. पावसामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या वाढून 5 झाली आहे. सुमारे 60 घरांचे नुकसान झाले असून राज्यात पुढील तीन दिवस मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या आपत्तीमध्ये नागरिकांच्या मदतीसाठी एनडीआरएफची टीम तैनात करण्यात आल्या आहेत. दक्षिण-पूर्व बंगालच्या खाडीत व आजूबाजूच्या क्षेत्रात कमी दबावाचा पट्टा बनणार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे.


**पश्चिम रेल्वे**
**बॉम्बार्डिअरचे वार्षिक परिरक्षण कंत्राट**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (रोलिंग स्टॉक), ईएमयू कारशेड, मुंबई सेंट्रल विभाग, पश्चिम रेल्वे, मुंबई – ४०० ०३४ हे खालील विद्युत कामाकरिता ई – निविदा मागवीत आहेत. **निविदा क्र.** : DRM-RS-2021-22-17, Dated : 08.11.2021, **कामाचे वर्णन** : ओईएमच्या माध्यमातून २ वर्षे कालावधीकरिता बॉम्बार्डिअर इलेक्ट्रिक्स फिटेड, ३ फेज ईएमयू (एमआरव्हीसी–२, आयसीएफ–७९, आयसीएफ–५२ व आयसीएफ–१२) गाड्यांचे सर्वसमावेशक वार्षिक परिरक्षण कंत्राट. **ठिकाण** : मुंबई सेंट्रल, कांदिवली व विरार कारशेड, **कामाचे अंदाजित मूल्य** : रु. ६१,९७,७६,४०३.२०, **इरठे** : शून्य, **सादरीकरणाची तारीख व वेळ** : दि. ०३.१२.२०२१ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत विहित स्वरूपात, वेबसाइटचा तपशील : निविदा वेबसाइट **www.ireps.gov.in** वर पाहता येऊ शकेल व त्या माध्यमातून सादर करता येऊ शकेल. **प्रस्तावांची वैधता** : उघडण्याच्या तारखेपासून ४५ दिवस. 0535

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly



**NOTICE**

Notice is hereby given that **Mrs. VIDYALAXMI VENKATESH KULKARNI** having original share certificate bearing No. **8** having distinctive No. **36 to 40** (both inclusive) **Nos. of shares 5 (five)** is respect of **SHIVAJI PARK OCEANA CO-OP. HSG. SOCIETY LTD**, having address at Plot No.377, Keluskar Road South, Shivaji Park, Dadar, MUMBAI-400028. The above share certificate was lost/misplaced or stolen and the member has applied for duplicate share certificate.

The public is hereby warned/invites against purchasing or dealing in any way with the above share certificate, any person (s) who have any claim and objection in respect of the said share certificate should lodge such claim with the Society office within 15 days from publication of the Notice. If no claims/objections are received within the period prescribed above, the Society shall be free to issue duplicate share certificate in such manner as is provided under the Bye-laws of the Society. If any claims/objection received by the Society shall be dealt with in the manner provided under the Bye-laws of the Society.

For and on behalf of
SHIVAJI PARK OCEANA CO-OP. HSG. SOCIETY LTD
HON. SECRETARY

Place: Mumbai
Date: 10th November, 2021



**पश्चिम रेल्वे**
**व्यापक जाहिरात हक्क**

सीनि. डीसीएम (वाणिज्यिक), पश्चिम रेल्वे, मुंबई सेंट्रल हे खालील दिलेल्या तपशिलानुसार निविदा मागवीत आहेत. **१) निविदा सूचना क्र. व दिनांक** : **कार्य व ठिकाण** : CA11_OOH - BAROB - SE1 - 21, dated : 02.11.2021, **कार्य व ठिकाण** : पाच वर्षे कालावधीकरिता वांद्रे आरओबी येथे – आरओबीच्या दक्षिण पूर्व बाजूस हार्बर लाइन ट्रॅकजवळ विद्यमान होर्डिंग संरचना पाडून व त्याजागी ४० फूट बाय ४० फूट (१) आकाराच्या पूर्व दिशेकडील नवीन होर्डिंगच्या उभारणी करून जाहिरातींच्या प्रदर्शनाकरिता व्यापक जाहिरात हक्क. **कामाचे अंदाजित मूल्य (५ वर्षांकरिता)** : रु. ६,६०,५८,५७८/– (कर आदी वगळता), **इरठे** : रु. १३,२१,२००/–. **२) निविदा सूचना क्र. व दिनांक : कार्य व ठिकाण** : CA11_OOH - BAROB - SE2 - 16, dated : 02.11.2021, **कार्य व ठिकाण** : पाच वर्षे कालावधीकरिता वांद्रे – आरओबी येथे, वांद्रे आरओबीच्या दक्षिण पूर्व दिशेस उपलब्ध रिक्त, पाडलेल्या व कालमर्यादा संपलेल्याएफसीएफएस होर्डिंग्जवर विद्यमान संरचना पाडून त्याजागी ४५ फूट बाय ४५ फूट (१) आकाराच्या पूर्व दिशेकडील नवीन होर्डिंगच्या उभारणी करून जाहिरातींच्या प्रदर्शनाकरिता व्यापक जाहिरात हक्क. एकूण क्षेत्र मोजमापित २०२५ चौ.फूट. **कामाचे अंदाजित मूल्य (५ वर्षांकरिता)** : रु. ५,५७,६२,०५७/– (कर आदी वगळता), **इरठे** : रु. ११,१५,३००/–. **ऑनलाइन सादरीकरणाची अंतिम तारीख व वेळ** : दि. ०३.१२.२०२१ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत प्रत्येक निविदेकरिता. **टीप** : १. निविदा दस्तावेज, शुद्धिपत्रक डाऊनलोड करणे व पुढील तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाइट **www.ireps.gov.in** ला भेट द्या. २. निविदा शुल्क व इरठेचे प्रदान केवळ ऑनलाइन नेट बँकिंग वा ई–पेमेंट गेटवेद्वारेच स्वीकारण्यात येईल. ३. बोलीदारांनी स्वत:स अद्ययावत ठेवण्यासाठी वेबसाइटला नियमित स्वरूपात भेट देत राहावे. 0534

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly



**Sale of Assets under Insolvency and Bankruptcy Code, 2016**
**E-Auction Sale Notice (5th Auction)**
**Mi Marathi Media Ltd (In Liquidation)**
**Liquidator: Subrata M. Maity (IP Regn. No. IBBI/IPA-001/IP-P00884/2017-2018/11481)**
**Email: subrata.m@hotmail.com Ph. No. 9821888984/8104617545**

**Date and Time of Auction: 18th November'2021 from 11 AM to 01.00 PM with unlimited extension of 5 min each**
Offers are hereby invited from interested persons/participants to be through e-auction platform http://ncltauction.auctiontiger.net for the sale of the following Assets in possession of the Liquidator on **"As is where is basis", "As is what is basis", "Without recourse basis".**
**As per following details:**

| Lot No. | Assets | Address | Reserve Price | Earnest Money Deposit (EMD) | Bid Increment Value | E-Auction Date & Time (with unlimited extension of 5 min each) | Last Date of Submission EMD |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Machinery & Electronic Equipments | Dattani Trade Center, Chandavarkar Road, Borivali (West), Mumbai - 400092 | Rs. 65.45 Lakhs | Rs. 6.55 Lakhs | Rs. 1.00 Lakh Only | 18th November' 2021 From 11.00 A.M. to 01.00 P.M. | 16th November' 2021 up to 3 p.m. |

1. The intending bidders are required to deposit Earnest Money (EMD) amount either through DD/NEFT/RTGS in the Account of Liquidator of Mi Marathi Media Ltd – in Liquidation" **Subrata M Maity, Account No.: 148605001129**, at ICICI Bank, Kamothe Navi Mumbai-410209, IFSC Code-ICIC0001486, drawn on any Scheduled Bank, payable at Kamothe Navi Mumbai and submit their KYC to the liquidator before 16th November' 2021, 4.00 pm
2. For Details of terms and conditions visit http://ncltauction.auctiontiger.net.
3. Interested Persons / Parties can inspect he material on 13th November' 2021 between 11 AM and 4 PM
4. E-Auction will be Conducted on "AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WITHOUT RECOURSE BASIS" through approved service M/S e-Procurement Technologies Ltd.
5. The Complete E-Auction process document containing details of the assets, online E-auction Bid Form, Declaration and Undertaking Form, General Terms and Conditions of online auction sale are available on website http://ncltauction.auctiontiger.net, Contact: Mr. Praveen kumar Thevar 9722778828 - 079 6813 6854/55/51 079-6813 6800; Email: nclt@auctiontiger.net
6. The Liquidator has the absolute right to accept or reject any or all offer(s) or adjourn/postpone/cancel the e-auction or withdraw any property or portion thereof from the auction proceeding at any stage without assigning any reason thereof. www.procuretiger.com or Contact: Liquidator Subrata M. Maity at 9821888984/8104617545 or email at : subrata.m@hotmail.com

Date: 10th November'2021
Place: Navi Mumbai

Sd/-
Subrata M. Maity
(Liquidator of Mi Marathi Media Ltd (In Liquidation)
IBBI Reg. No. IBBI/IPA-001/IP-P00884/2017-2018/11481
Address: B-202, Jai Gurudeo Complex Plot No. 16-25, Sector-17, Kamothe, Navi Mumbai-410209.



मुख्य कार्यालय, विरार
विरार (पुर्व),
ता. वसई, जि. पालघर-४०१ ३०५

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जावक क्र. : व.वि.श.म./बांध/११७८/२०२१
दिनांक : ८/११/२०२१

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**सार्व. बांधकाम विभाग, मुख्यालय, विरार पुर्व**
**जाहिर ई-निविदा सुचना**

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'आय' अंतर्गत खालील उल्लेखीत कामांचे कोरे निविदा फॉर्म (https://mahatenders.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर दि. ११/११/२०२१ पासुन उपलब्ध होणार आहे. ई-टेंडरिंग बाबत अधिक माहितीसाठी ई-निविदा कक्ष, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११४ मधील वसई पाचुबंदर येथे करप्या धोंडू घरापासुन ते मदन देवखाद्या घरापर्यंतचा रस्त्यास आर.सी.सी उघाडी बांधणे व रस्त्याची उंची वाढविणे. |

दिनांक : ०८/११/२०२१
Please Visit our Official web-site (https://mahatenders.gov.in)

सही/-
शहर अभियंता
वसई विरार शहर महानगरपालिका



।। अविश्रमो लोकतंत्राधिकारा ।।
**खोपोली नगरपरिषद**
खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीनकोड नं. ४१० २०३
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११

जा.क्र. केएमसी/बांधकाम/ दिनांक : /११/२०२१

**बांधकाम विभाग**
**निविदा सुचना क्र.**

खोपोली नगरपरिषद, खोपोली जि. रायगड यांजकडून खालील कामांसाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गात नोंदविलेल्या अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून ब-१ नमुन्यातील द्विनोंद लिफाफा पध्दतीने सिलबंद निविदा मागविणेंत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | अनामत रक्कम रु. | काम करण्याचा कालावधी | निविदा फॉर्म विक्रीची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील लौजी येथील शाळा क्र.०८ चे पत्रे बदलणे | ९,११,१८२/- | १८२२५/- | ३० दिवस | १००० |
| २ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील वासरंग येथील शाळा क्र.०७ चे पत्रे बदलणे | ९,१०,०४०/- | १८२००/- | ३० दिवस | १००० |
| ३ | शिळ फाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ वॉचमन केबिन बांधणे. | ९८,१००/- | २०००/- | १५ दिवस | ५०० |
| ४ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील लौजी चिंचवली रस्त्यामध्ये आर.सी.सी. पाईप टाकणे. | ४,९९,०५०/- | १०,०००/- | ३० दिवस | १००० |
| ५ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील अमरधाम स्मशानभुमी येथील अस्तित्वातील ना-दुरुस्त असलेली शवदाहीनी काढून नविन शवदाहीनी बसविणे. | १७००००/- | ३४००/- | ३० दिवस | १००० |

**कामाच्या अटी व शर्ती :-**

१. निविदा फॉर्मची विक्री कार्यालयीन वेळेत दि. १०/११/२०२१ ते २२/११/२०२१ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं ५.३० वा. पर्यंत राहील. मात्र या करिता निविदा फॉर्म फी नागरी सुविधा केंद्रात जमा केल्यानंतर बांधकाम विभागातुन फॉर्म उपलब्ध करुन मिळेल.

सविस्तर कामासंबधी अतिरीक्त माहिती नगरपरिषदेचे बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.

सही/-
मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद